आय.सी.टी. योजना (तिसरा टप्पा) अंमलबजावणी संदर्भात बिर्ला श्लोका एज्युटेक लि. आणि व्हीजन इंडिया सॉफ्टवेअर एक्सपोर्टस् लि. या संस्थेस निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः आयसीटी- २०१४/प्र.क्र.२५ भाग-१/एस.डी-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई
दिनांक: २८ फेब्रुवारी, २०१९

<u>संदर्भ :-</u>

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि. २५/०३/२०१३
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक ,दि.०७/११/२०१३
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५(३)/एस.डी.१, दि.३०/०७/२०१४
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि.१२/०९/२०१४
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि.३१/०५/२०१५
६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि.११/०९/२०१५
७) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि.१८/०३/२०१६
८) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि.३०/०३/२०१६
९) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि.२०/१०/२०१६
१०) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि.२५/११/२०१६
११) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि.१६/०३/२०१७
१२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि.२२/०९/२०१७
१३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५ भाग-१/एस.डी.१, दि.०२/११/२०१७
१४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५ भाग-१/एस.डी.१, दि.२५/०१/२०१८
१५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५भाग-१/एस.डी.१, दि.२०/०३/२०१८
१६) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाचे पत्र क्र.सशिअ/रामाशिअ/आयसीटी/टप्पा-३/Vision India-८-Sem/२०१८-१९/(१८/१८)/९७८, दि.२६/०९/२०१८
१७) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाचे पत्र क्र.रामाशिअ/ICT२school/PhaseIII/PBP२०१७-१८/२०१८-१९/९७९, दि.२६/०९/२०१८

१८) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२/०४/२०१८

१९) केंद्र शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली आदेश क्रमांक: F.No-७-८/२०१८-IS-१२(SC), दि.३०/०१/२०१९

२०) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५भाग-१/एस.डी.१, दि.१३/०२/२०१९

<u>प्रस्तावना-</u>

राज्यात केंद्र पुरस्कृत माहिती तंत्रज्ञान व दळणवळण (Information & Communication Technology) योजनेच्या तिसरा टप्पा ५००० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये राबविण्यास शासनाच्या संदर्भाधिन दि. २५/०३/२०१३ आणि दि.०७/११/२०१३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजना BOOT तत्वावर राबविण्यात येत असून यासाठी निविदा प्रक्रियेव्दारे ५ वर्षासाठी BOOT तत्वावर प्रतिशाळा रुपये १७.९० लक्ष एवढया दराने योजना राबविण्यासाठी दोन ऑपरेटर्सची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या योजनेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या दोन ऑपरेटर्सपैकी बिर्ला श्लोका एज्युटेक लि. आणि व्हीजन इंडिया सॉफ्टवेअर एक्सपोर्टस् लि. या संस्थेस दि.२५/०३/२०१३ च्या शासन निर्णयान्वये ८५० शाळा मंजूर करण्यात आलेल्या आहेत. सदर संस्थेने ८५० शाळापैकी ८३८ शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा स्थापन केलेल्या आहेत.

केंद्र शासनाने संदर्भ क्र.१९ येथील आदेशान्वये आय.सी.टी.योजनेकरिता अनुसूचित जाती उप योजना (SCP) हिस्स्याचा रु.४८८.३७ लाख इतका निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा केलेला आहे. सदर निधीच्या प्रमाणात राज्य हिस्याचा निधी रु.३२५.५८ लाख इतका येतो. बिर्ला श्लोका एज्युटेक लि. आणि व्हीजन इंडिया सॉफ्टवेअर एक्सपोर्टस् लि.या ऑपरेटरला रु.१३,४६,३२,७००/- (रु.तेरा कोटी शेहेचाळीस लाख बत्तीस हजार सातशे फक्त) इतका निधी वितरीत करण्याचे प्रस्ताव समग्र शिक्षा (राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान) मार्फत संदर्भ क्र.१६-१७ येथील पत्रान्वये सादर करण्यात आले आहेत. सदर निधीपैकी रु.७,५०,००,०००/- (रु.सात कोटी पन्नास लाख फक्त) इतका निधी शासन निर्णय दि.१३/०२/२०१९ अन्वये मंजूर केला आहे.

आय.सी.टी.योजनेकरिता सन २०१८-१९ साठी उपलब्ध निधी विचारात घेऊन बिर्ला श्लोका एज्युटेक लि. आणि व्हीजन इंडिया सॉफ्टवेअर एक्सपोर्टस् लि.यांना वितरीत करण्यासाठी मागणी केलेल्या निधीपैकी उर्वरित रु.५,९६,३२,७००/- (रु.पाच कोटी शहान्नव लाख बत्तीस हजार सातशे फक्त) इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय -</u>

बिर्ला श्लोका एज्युटेक लि. आणि व्हीजन इंडिया सॉफ्टवेअर एक्सपोर्टस् लि. या संस्थेला ८३८ शाळांत आय.सी.टी.योजनेच्या अंमलबजावणीकरीता रु.५,९६,३२,७००/- (रु.पाच कोटी शहान्नव लाख

बत्तीस हजार सातशे फक्त) इतका निधी वितरीत करण्यास सदर शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१८-१९ या चालू आर्थिक वर्षाकरिता "मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, ७८९ अनुसूचित जाती उपयोजना, (०१) अनुसूचित जाती उपयोजना, (०१) (०१) शाळामध्ये माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान योजना कार्यान्वित करणे (अनुसूचित जाती उपयोजना) (केंद्र हिस्सा) (२२०२ आय १७४), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षांतर्गत रुपये १५०० लाख इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. या लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ या चालू आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध तरतूदीमधून रु.४,८८,३७,०००/- (रु.चार कोटी अठ्ठयाऐंशी लाख सदतीस हजार फक्त) इतका खर्च भागविण्यात यावा.

३. सन २०१८-१९ या चालू आर्थिक वर्षाकरिता "मागणी क्रमांक २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, ७८९ अनुसूचित जाती उपयोजना, (०१) अनुसूचित जाती योजना, (०१) (०२) शाळांमध्ये माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान योजना कार्यान्वित करणे (अनुसूचित जाती उपयोजना) (राज्य हिस्सा) (२२०२ आय १८३), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षांतर्गत रुपये ७०० लाख इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. या लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ या चालू आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध तरतूदीमधून रुपये १,०७,९५,७००/- (रु.एक कोटी सात लाख पंच्यान्नव हजार सातशे फक्त) इतका खर्च भागविण्यात यावा.

४. सदर आदेश वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०२/०४/२०१८ रोजीच्या परिपत्रकास अनुसरुन व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३९/अर्थसंकल्प(विघयो), दि.२०/०२/२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०२/०४/२०१८ रोजीच्या परिपत्रकातील अटींची तसेच परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील १, २, ३,४,५, ६ व ७ मधील बाबी या आदेशासाठी लागू नाहीत. परिपत्रकातील परिच्छेद-७ (६) नुसार केंद्र शासनाचा निधी प्राप्त झाला असल्याचे अभिप्राय वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अनौपचारिक संदर्भ क्र.५४/अर्थोपाय, दि.०६/०२/२०१९ अन्वये दिलेले आहेत.

५. सदर खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०२/०४/२०१८ रोजीच्या परिपत्रकातील सूचना नुसार करण्यात यावा. तसेच सदर निधी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लाभार्थ्यासाठीच खर्च करण्याची दक्षता घेण्यात यावी. यासाठी अवर सचिव / कक्ष अधिकारी (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी व सह सचिव (प्रशासन) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२८१२५८०७२२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Umeshrao Gaikwad

Digitally signed by Santosh Umeshrao Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d60828c41033ab1da6d64ef17879745d578b334c05c1e8151ef933f134060bc, serialNumber=bc8833f9e213a7e4dfb9d2b071c9202ea52a04054e53b0c1bbf9e50c90a2cf5c, cn=Santosh Umeshrao Gaikwad
Date: 2019.02.28 13:00:08 +05'30'

(संतोष गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
३) मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
५) राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा, चर्नीरोड, मुंबई
६) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२ मुंबई, नागपूर
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
९) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई - ६३
१०) सह सचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
११) जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई
१२) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१३) अवर अधिकारी / कक्ष अधिकारी (रोख शाखा)/, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) वित्त विभाग, व्यय-५ / अर्थसंकल्प शाखा
१५) रोख कार्यासन / अर्थसंकल्प कार्यासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) निवड नस्ती - एस.डी.१, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई